**प्रेसनोट दिनांक २३/०६/२०२२**

**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी**

**आरोपीस पकडताना पोलीसांवर वारकरून पळुन जाणाऱ्या दरोडेखोरांना ४८ तासात अटक करून, त्यांचेकडुन कि.रू. ९,६३,५००/- रूचा मुद्देमाल हस्तगत.**

जगदगुरू संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा याचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या उद्देशाने पेट्रोलिंग करून, दरोडा, चेन चोरी, जबरी चोरी, वाहन चोरी या गुन्हयास प्रतिबंध करणेबाबत मा. वरिष्ठांनी दिलेल्या आदेश व सुचनाप्रमाणे दरोडा विरोधी पथकातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, पथकातील अधिकारी व अंमलदार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोंबिग ऑपरेशन करीत असताना, पोउपनिरी भांगे यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पडक्या बिस्त्रो हॉटेलचे जागेत, चिंचवड पुणे येथे काही इसम एका सिल्व्हर रंगाचे सॅन्ट्रो कार क्रमांक एम एच ४३ ए. ४७५५ या मध्ये काही इसम हे संशयीतरित्या फिरत असुन, ते सदर परिसरातील राहीवासी नसुन, त्यांच्या हालचाली संशयास्पद आहेत अशी माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उत्तम तांगडे यांनी पोलीस उप निरीक्षक श्री. मंगेश भांगे यांची एक टिम तयार करून त्यांना कारवाई करणेबाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे कारवाई करीत असताना तीन इसम (नावे निष्पन्न आहेत) हे पोलीस आल्याची चाहुल लागताच गाडी सोडुन आंधाराचा फायदा घेवुन, झाडीतुन पळुन गेले व उर्वरीत दोन इसमाना मोठया शिताफिने ताब्यात घेण्यात आले.

त्यांची नावे १) **करणसिंग रजपुतसिंग दुधाणी**, वय २५ वर्षे, रा. अंध शाळेच्या पाठीमागे, रामटेकडी, हडपसर, पुणे २) **अनिल बच्चन टाक**, वय २९ वर्षे, रा. दत्त मंदिराचे मागे, चिकन चौक, सम्राटनगर, ओटा स्किम, निगडी, पुणे यांना दिनांक ०६/०६/२०२२ रोजी २२:४५ वा वरिल स्टाफचे मदतीने ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीतांचे अंगझडती मध्ये कि.रू. २,०३,५००/- चे एक बोअर कटर, दोन स्क्रु ड्रायव्हर, एक कोयता, दोन लोखंडी कटावणी व एक सेंन्ट्रो कार असा माल मिळुन आल्याने, त्यांच्याकडे चौकशी करता ते घरफोडीचे हत्यारानिशी भारत पेट्रोलियम, वाल्हेकरवाडी रावेत रोड, चिंचवड पुणे येथे दरोडा टाकण्याचे उद्देशाने आल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांचे विरूध्द **चिंचवड पोलीस ठाणे गुरनं २५८/२०२२ भा.दं.वि.कलम ३९९, ४०२, आर्म ॲक्ट ४(२५) व महा. पोलीस अधि.१९५१ चे कलम ३७(१) सह १३५** अन्वये गुन्हा दाखल केला.

नमुद आरोपीतांची दिनांक १५/०६/२०२२ रोजी पर्यंतची ०९ दिवस पोलीस कोठडीची रिमांड घेवुन, त्यांच्याकडे पोलीस कोठडी मुदतीत अतिशय बारकाईने व सखोल चौकशी केली असता, आरोपी **करणसिंग रजपुतसिंग दुधाणी** व त्याचा पाहिजे आरोपी साथीदार **जितसिंग राजपालसिंग टाक** असे दोघांनी मिळुन निगडी पोलीस ठाणे गुरनं ४२२/२०२२ भादवि कलम ३७९ या गुन्हयातील गाडी चोरल्यानंतर त्यांचा खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व दोन पोलीस अंमलदार पाठलाग करीत असताना, पोलीसांनी त्यांना सोमाटणे फाटा, टोलनाक्याजवळ पकडण्याचा प्रयत्न केला असता, त्यावेळी आरोपी करणसिंग दुधाणी, जितसिंग टाक यांनी पोलीसांना प्रतिकार करून, गाडी सोडुन तेथुन पळुन गेले होते. त्याबाबत **तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन २७२/२०२२ भादवि कलम ३०७, ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४** प्रमाणे गुन्हा नोंद आहे. तसेच आरोपीकडे सखोल व बारकाईने तपास करता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

**१) चिंचवड पोलीस ठाणे गुरनं २२०/२०२२ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०**
**२) पिंपरी पोलीस ठाणे गु.र.नं. ३५८/२०२२ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०**
**३) चिंचवड पोलीस ठाणे गुरनं २४५/२०२० भादवि कलम ४५४, ४५७, ३८०**
**४) नारपोली पोलीस ठाणे गुरनं ५६/२०२१ भादवि कलम ३७९**
**५) चिखली पोलीस स्टेशन गुरनं २४८/२०२२ भादवि कलम ३७९**
**६) निगडी पोलीस ठाणे गुरनं ४२२/२०२२ भादवि कलम ३७९**
**७) तळेगाव पोलीस स्टेशन २७२/२०२२ भादवि कलम ३०७, ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४**
**८) खडकी पोलीस ठाणे गुरनं १३७/२०२२ भादवि कलम ३७९**

वरिलप्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन, सदर गुन्हयातील **०२ सेंट्रो कार, ०१ मारूती इको कार, सोन्याचे दागिने, एक मोबाईल फोन व एक बजाज पल्सर मो.सा.** असा एकुण किंमत ७,६०,०००/- व वरील २,०३,५००/- असा एकुण **कि.रू. ९,६३,५००/- रू चा** मुद्देमाल पोलीस कस्टडी दरम्यान जप्त करण्यांत आला आहे.

**आरोपी करणसिंग दुधाणी** हा खालील गुन्हयामध्ये <u>**पाहिजे आरोपी**</u> असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**१. हडपसर पोलीस ठाणे गुरनं ५१२/२०२२ भादवि कलम ४५७, ३८०, ५११**
**२. हडपसर पोलीस ठाणे गुरनं २६०/२०२२ भादवि कलम ४५४, ४५७, ३८०**
**३. हडपसर पोलीस ठाणे गुरनं ४३७/२०२२ भादवि कलम ३७९**
**४. कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ४२३/२०२२ भादवि कलम ४५७, ३८०**
**५. कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ४०८/२०२२ भादवि कलम ३७९**
**६. यवत पोलीस ठाणे गुरनं ३८१/२०२२ भादवि कलम ४५७, ३८०**
**७. लोणीकाळभोर पोलीस ठाणे गुरनं २३७/२०२२ भादवि कलम ३७९**

<u>**आरोपी करणसिंग दुधाणी याचेवर दाखल असलेले गुन्हे**</u>

१) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं १०९२/२०२१ भादवि ३७९
२) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं १०६९/२०२१ भादवि ४५७, ३८०
३) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ७०१/२०२१ भादवि ३७९, ३४
४) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ५६५/२०२१ भादवि ३८०
५) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ८३७/२०२१ भादवि ३८०
६) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ६६८/२०२१ भादवि ४५४, ३८०
७) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ९८६/२०२१ भादवि ४५४, ४५७, ३८०
८) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गुरनं १५८/२०१८ भारतीय हत्यार कायदा क. ४(२५)(२७)
९) विमानतळ पोलीस ठाणे गुरनं १७३/२०१८ भादवि ४५७, ३८०, ३४
१०) हडपसर पोलीस ठाणे गुरनं ५८१/२०१८ भादवि महा. पो.अधि. क. ३७(१)(३) सह १३५
११) विमानतळ पोलीस ठाणे गुरनं ५६/२०१८ भादवि ४५४, ३८०, ४११, ३४
१२) विमानतळ पोलीस ठाणे गुरनं २६४/२०१८ भादवि ३७९, ३४
१३) विश्रांतवाडी पोलीस ठाणे गुरनं ३७८/२०१८ भादवि ३७९, ३४
१४) सिंहगडरोड पोलीस ठाणे गुरनं ६६४/२०१८ भादवि ३९२, ५०६, ३४
१५) विमानतळ पोलीस ठाणे गुरनं १७३/२०१८ भादवि ४५७, ३८०, ३४
१६) बंडगार्डन पोलीस ठाणे गुरनं ३८४/२०१८ भादवि ३०९
१७) बिबवेवाडी पोलीस ठाणे गुरनं ३०१/२०१८ भादवि ४५४, ४५७, ३८०, ३४
१८) विमानतळ पोलीस ठाणे गुरनं १८८/२०१८ भादवि ४५४, ४५७, ३८०
१९) चर्तुक्षृंगी पोलीस ठाणे गुरनं ६०६/२०१८ भादवि ३९२, ३९५, ३४
२०) सिंहगडरोड पोलीस ठाणे गुरनं ६२७/२०१८ भादवि ४५४, ३८०, ३४
२१) हडपसर पोलीस ठाणे गुरनं ५५३/२०१८ भादवि ३७९
२२) कोंढवा पोलीस ठाणे गुरनं ३७६/२०२१ भादवि ४५७, ३८०, ५११, ३४
२३) हडपसर पोलीस ठाणे गुरनं ५५४/२०१८ भादवि ३७९
२४) खडकी पोलीस ठाणे गुरनं ३०८/२०१८ भादवि ४५४, ४५७, ३८०, ४११, ३४
२५) हिंजवडी पोलीस ठाणे गुरनं ३४६/२०१८ आर्म ॲक्ट कलम ४(२५)

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे, पोलीस उप निरीक्षक श्री. मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, आशिष बनकर, प्रविण कांबळे, प्रविण माने, गणेश कोकणे, समीर रासकर, विनोद वीर, अमर कदम, राजेश कौशल्ये, राजेंद्र शिंदे, औदुंबर रोंगे, चिंतामण सुपे, यांचे पथकाने केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**

# प्रेसनोट दिनांक २०/०६/२०२२
## दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी
## खुनाच्या गुन्हयातील आरोपीतांना ४ तासात अटक

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील भोसरी पोलीस ठाणेचे हद्दीत दिनांक १७/०६/२०२२ रोजी खडीमशिन, भोसरी येथील मोकळया मैदानात मयत इसम दिपक गोपाळ वाघमारे यास अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून दगडाने व धारधार हत्याराने गळयावर, मानेवर व डोक्यात मारून गंभीर जखमी करून खुन केला असलेबाबत **भोसरी पोलीस ठाणे गुरनं ४८७/२०२२ भादवि कलम ३०२, १२०(ब), ३४ व आर्म ॲक्ट ४(२५)** प्रमाणे गुन्हा दाखल झाला. सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना, दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे हे सपोनि कैलासे व पोलीस अमंलदार असे गुन्हयाचे घटनास्थळी जावुन, मयताबाबत सविस्तर माहिती घेतली असता, घटनास्थळावर मयताचे आधारकार्ड प्राप्त झाले, त्याच्या राहण्याच्या पत्यावर जावुन मयताबाबत सखोल व बारकाईने चौकशी केली असता, त्याचे काही महिन्यापुर्वी एका इसमाशी भांडण झाल्याची प्राथमीक माहिती प्राप्त झाली. त्या दृष्टीने तपासाचे सुत्र फिरवुन तपास सुरू केला असता, मयताचे भांडण झालेल्या इसमाचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून, त्याचे ठावठिकाण्याबाबत माहिती घेवुन त्याचे राहते पत्यावर जावुन चेक केले असता, तो दिनांक १७/०६/२०२२ रोजी पासुन घरी आला नसल्याचे समजले, यावरून त्याचे वरील संशय आणखीन बळावला. सदर इसमाचा शोध घेत असताना पोलीस नाईक सागर शेडगे यांना मिळालेल्या बातमीच्या आधारे नमुद इसमास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे वय १७ वर्षे, असे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने त्याचे साथीदार रोहीत उर्फ कक्या सोनवणे, रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी व सुनिल जावळे, रा. सदगुरूनगर भोसरी, पुणे यांचेसह मयत दिपक वाघमारे याचा खुन केल्याची कबुली दिली. नमुद विधीसंर्घषग्रस्त बालक यास ताब्यात घेवुन, त्याचे इतर साथीदारांचा शोध घेत असताना पोलीस शिपाई गणेश सावंत व सुमीत देवकर यांना मिळालेल्या बातमीच्या आधारे आरोपी नामे १) **सुनिल रानोजी जावळे**, वय २३ वर्षे, रा. गणपत लांडगे चाळ, सदगुरूनगर, भोसरी, पुणे २) **रोहीत ज्ञानेश्वर सोनवणे**, वय १८ वर्षे, रा. सागर कॅफे पाठीमागे, आळंदी रोड, भोसरी, पुणे यांना दिनांक १८/०६/२०२२ रोजी चाकण परिसरात शिताफीने अटक करण्यात आली.

अधिक तपास करता मयत दिपक वाघमारे याचे विधी संर्घषग्रस्त बालकाचे आई सोबत सुमारे पाच वर्षापासुन प्रेम संबध असल्याने, त्याचे घरी नेहमी येणे जाणे होते तो नेहमी त्यांचे घरी येवुन, त्याची आई, वडील व मला शिवीगाळ करून, मारहाण करीत असे, तसेच तो नेहमी विधी संर्घषग्रस्त बालक व त्याची बहिण यांना शिवीगाळ करून, घरी कोणी असताना नसताना येत असे त्याचा राग विधी संर्घषग्रस्त बालकाचे मनात होता. त्यावेळी विधी संघर्षग्रस्त बालक हा लहान होता. मयत दिपक वाघमारे याचे त्रासाला कंटाळुन विधी संर्घषग्रस्त बालकाचे कुटूंबीयांनी भोसरी येथील घर सोडुन दिघी येथे राहण्यास गेले तरी देखील मयत दिपक वाघमारे तेथे येवुन दारू पिवुन विधी संर्घषग्रस्त बालकाचे कुटूंबीयांना त्रास देत होता. ४ वर्षापुर्वी या संबधी पोलीस ठाणेस तक्रार दिली होती, तेव्हा आपआपसात समझोता करून सदरची तक्रार मागे घेतल्याची माहिती प्राप्त झाली. दिपक वाघमारे याचेबाबत विधी संर्घषग्रस्त बालक याचे मनात राग मनात असल्याने, त्याने त्याचे साथीदार सुनिल जावळे व रोहीत सोनवणे यांचेसह दिपक वाघमारे याचा काटा काढण्याचे नियोजन केले होते. त्याप्रमाणे विधी संर्घषग्रस्त बालक याने सुमारे ४ महिन्यापुर्वी नारळ पाणी विकणाऱ्या इसमाचा कोयता चोरी करून, तो लपवुन ठेवला होता. दिनांक १७/०६/२०२२ रोजी विधी संर्घषग्रस्त बालकाने लपवुन ठेवलेला कोयता आपले कंबरेत खोचुन, ठरल्याप्रमाणे मयतास सांगितले की, त्याचे एका जणाकडे ३,०००/- रू असुन, तो पैसे देत नाही. त्याने मला पैसे घेण्यासाठी खडी मशिन, भोसरी येथील मोकळया मैदानात बोलाविले आहे. तुम्ही माझ्यासोबत चला असे खोटे सांगुन मयताचे मोटारसायकल वरून वरील ठिकाणी गेले. त्या ठिकाणी ठरल्याप्रमाणे विधी संघर्षग्रस्त बालकाचा एक साथीदार मैदानात थांबला व दुसरा साथीदार लपुन थांबलेला होता. विधी संघर्षग्रस्त बालक

मयतास आरोपी सुनिल जावळे याच्या जवळ घेवुन गेला. मयत त्याचे सोबत पैसे देणेबाबत बोलत असताना विधी संघर्षग्रस्त बालक याने त्यास फोन आल्याचा बहाणा करून, मयताच्या पाठीमागे जावुन, त्याचे कंबरेमध्ये खोचलेल्या कोयत्याने पाठीमागुन मयताच्या डोक्यात मारला त्यावेळी मयत खाली पडला असता, त्याच्या गळयावर कोयत्याने वार केले व त्याचे इतर दोन साथीदारांनी दगडाने मयतास मारहाण करून खुन केला.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे, सहा पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे, तसेच पोलीस अंमलदार विक्रांत गायकवाड, सागर शेडगे, गणेश हिंगे, सुमीत देवकर, गणेश सावंत यांचे पथकाने केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**